"राज्यातील मान्यवर वृध्द साहित्यिक व कलावंत इत्यादींना मानधन " या योजनेंतर्गत सन्मानार्थ्यांच्या निवड इष्टांकात व मानधनाच्या रक्कमेत वाढ करणेबाबत

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्र. पुरक ६९१९/प्र.क्र.८३/सां.का.४**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : ०९ सप्टेंबर, २०१९**

**<u>वाचा</u> :-** १) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. वृकमा २०१२/ प्र.क्र.११७/ सां.का.४, दिनांक ७ फेब्रुवारी, २०१४.
२) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. वृकमा २०१३/ प्र.क्र.४०/सां.का.४, दिनांक २२ ऑगस्ट, २०१४.

**<u>प्रस्तावना :-</u>**

राज्य शासनामार्फत सन १९५४-५५ पासून " राज्यातील मान्यवर वृध्द साहित्यिक व कलावंत यांना मानधन " ही योजना राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या मानधनात शासनाने सन २०१४ मध्ये वाढ केलेली होती. वयोवृध्द कलाकारांची संख्या जास्त असल्याने सद्य:स्थितीत असलेला सन्मानार्थी निवडीचा ६० हा इष्टांक कमी असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. मागील ५ वर्षांच्या कालावधीतील वाढती महागाई, तसेच लोकप्रतिनिधी, कलावंत तसेच विविध कलाकार संघटना यांचेकडून विषयांकित मानधनात वाढ करणेबाबत प्राप्त झालेल्या मागण्या विचारात घेता, प्रतिवर्षी सन्मानार्थी निवड इष्टांकात व मानधनात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

" राज्यातील पात्र वृध्द साहित्यिक व कलावंत मानधन " या योजनेतंर्गत प्रतिवर्षी प्रत्येक जिल्ह्यातील सन्मानार्थी निवड इष्टांक ६० वरुन १०० करण्यास व मानधनामध्ये दीडपट वाढ करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. ही वाढ या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येईल.

२. राज्यातील आजतागायत पात्र लाभार्थ्यांना तसेच भविष्यात १०० या इष्टांकाच्या मर्यादेत पात्र ठरणा-या लाभार्थ्यांना खालीलप्रमाणे मानधन अदा करण्यात येईल.

| अ. क्र. | साहित्यिक / कलावंतांची वर्गवारी | सध्याच्या मानधनाची रक्कम (वार्षिक) | वाढीव मानधनाची रक्कम (वार्षिक) |
|---|---|---|---|
| १. | अ (राष्ट्रीय कलावंत) | रुपये २५,२००/- (रु.२,१००/- प्रतिमाह x १२ महिने) | रुपये ३७,८००/- (रु.३,१५०/- प्रतिमाह x १२ महिने) |
| २. | ब (राज्यस्तरीय कलावंत) | रुपये २१,६००/- (रु.१,८००/- प्रतिमाह x १२ महिने) | रुपये ३२,४००/- (रु.२,७००/- प्रतिमाह x १२ महिने) |
| ३. | क (स्थानिक कलावंत) | रुपये १८,०००/- (रु.१,५००/- प्रतिमाह x १२ महिने) | रुपये २७,०००/- (रु.२,२५०/- प्रतिमाह x १२ महिने) |

३. यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना नियंत्रण अधिकारी तसेच लेखाधिकारी, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदरचा खर्च हा मागणी क्र. झेडडी-२, मुख्य लेखाशीर्ष २२०५, कला व संस्कृती, (००) ८०० इतर खर्च, (०१) (०१) साहित्य व कला इ. क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींना आर्थिक सहाय्य (२२०५ १९०१) ५० - इतर खर्च या लेखाशीर्षाखालील प्रत्येक आर्थिक वर्षातील उपलब्ध तरतूदीतून भागविण्यात यावा.

५. सदरचा शासन निर्णय वित्त विभाग, अनौ. संदर्भ क्र. ३२५/२०१९/व्यय.१५, दिनांक २०.०८.२०१९ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०९०९१५२५०१४५२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

Vilas Ramrao Thorat

Digitally signed by Vilas Ramrao Thorat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e6cc4d20348a52de465c7c34a61591bbe69b747ae11457103a0cfb9a57fc6ce6, serialNumber=cb03c92b399cc89310bf1378c184d97a4b7b9b98e926ea8e71dd7bc9cb273631, cn=Vilas Ramrao Thorat
Date: 2019.09.09 15:37:25 +05'30'

**( विलास रा. थोरात )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव
२. सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. महालेखापाल (लेखापरीक्षा) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
७. महालेखापाल (लेखापरीक्षा) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
८. वित्त विभाग (व्यय-१५/अर्थसंकल्प-११), मंत्रालय, मुंबई
९. सर्व विभागीय आयुक्त
१०. सर्व जिल्हाधिकारी
११. सर्व जिल्हा परिषदांचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
१२. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१४. सर्व जिल्हयांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
१५. सर्व जिल्हा परिषदांचे समाज कल्याण अधिकारी
१६. मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्हयातील सर्व तहसिलदार
१७. सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी
१८. सर्व जिल्हयांचे कोषागार अधिकारी,
१९. सर्व जिल्हयांचे उप कोषागार अधिकारी,
२०. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागातील सर्व अधिकारी
२१. निवड नस्ती, सां.का.४